अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,
**न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पारनेर**
ता. पारनेर, जि. अहमदनगर- ४१४३०२
**NAAC Re-Accredited 'A' Grade, DST-FIST & RUSA Sponsored College**
iqacnacsp@gmail.com; www.newartsparner.com

# अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि महिला सक्षमीकरण कक्ष

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२

## अहवाल

**प्रास्ताविक :-**

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर महाविद्यालयात महिला सबलीकरण कक्ष २०१९ पासून अस्तित्त्वात आहे. यु.जी.सी. च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. यातत्त्वानुसार उच्च शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांच्यासाठी महाविद्यालयात सुरक्षित व अनुकूल असे वातावरणात असावे, असे निर्देश दिलेले आहेत. याच उद्देशाने महाविद्यालयात महिला साक्षमीकरण कक्षाची स्थापना केलेली आहे. यातून विद्यार्थिनी व महाविद्यालयात कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी यांचा विकास होण्याच्या दृष्टीने निरोगी वातावण निर्माण करणे, त्यांना लिंग समानतेच्या पातळीवर आणणे व कोणत्याही प्रकारे लैंगिक छळाच्या भितीशिवाय वावरतील, काम करू शकतील व शिक्षण घेऊ शकतील. याच दिशेने हा कक्ष कार्य करतो.

**दृष्टी:**

स्त्री-पुरुष समानतेसाठी यंत्रणा वाढवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे.

**ध्येय :**

- लैंगिक छळ रोखणे.
- लिंग समानता वाढवणे.
- लिंग न्याय आणि भेदभाव न करण्याला प्रोत्साहन देणे.

**उद्दिष्टे:**

- कामासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.
- सर्व लिंगांमध्ये परस्पर आदर निर्माण करणे.

- महिला सक्षमीकरण करणे.

**कार्य पद्धती:**

- वार्षिक लिंग संवेदीकरण कृती आराखडा तयार करणे.
- लिंग समानता जागृती कार्यक्रम आयोजित करणे.
- महिला सक्षमीकरण आणि सामाजिक उन्नतीसाठी काम करणे.
- क्रियाकलापांद्वारे सर्व भागधारकांमध्ये लैंगिक सौहार्द निर्माण करणे.

वरील धेय्य, उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेऊन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महिला सक्षमीकरण कक्षांतर्गत महाविद्यालयात एकूण ०७ कार्यक्रमांचे आयोजन केले गेले.

१) महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता या विषयावरील व्याख्यान.

२) प्रथमवर्ष प्रवेशीत विद्यार्थिनींसाठी प्रेरणा व जागृती कार्यशाळा.

३) स्व - संरक्षण कार्यशाळा.

४) महिला उद्योजिकेचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन.

५) सावित्रीबाई फुले जयंती निमित्त रांगोळी, पोष्टर स्पर्धा व जनजागृती फेरी.

६) कौशाल्याधिष्ठीत कार्यशाळा आयोजन.

७) संगणक साक्षरता कार्यक्रम

यासर्व उपक्रमांचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे-

१) महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षांतर्गत **महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता** या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी **डॉ. पद्मजा पठारे** यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, आपली जडणघडण चांगली होण्यासाठी स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. आपण स्वतः जागृत झालो तर आपण आजूबाजूच्या महिलांनाही जागृत करू शकतो. यासाठी प्रथम आपल्या आहाराकडे लक्ष देणे खूप गरजेचे आहे. संतुलित आहार घेणे, वेळेत जेवण करणे, त्याचबरोबर षड्रसात्मक आहार घेणे महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा आहे. फळांचा रोजच्या आहारामध्ये समावेश असावा. त्यामुळे, पचनशक्ती सुधारते. पोट चांगले तर

सगळ्या गोष्टी चांगल्या. आहार संतुलित असेल तर केस, त्वचा यावरही त्याचा चांगला परिणाम होतो. म्हणूनच म्हणतात की, प्रेमाचा मार्ग पोटातून जातो. आहाराबरोबर सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यानधारणा हेही मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी रोज करायलाच हवे. प्राणायामामुळे शरीरात ऑक्सिजन मोठ्या प्रमाणात घेतला जातो, त्याने शरीर सुदृढ होते व मनही सुदृढ होते. असे त्यांनी सांगितले.

या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तराच्या सत्रात मुलींनी डॉ. पद्मजा पठारे यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या समोर आपल्या आरोग्यविषयक समस्यान बरोबरच आपल्या आईच्या काही आरोग्यविषयक तक्रारीविषयी देखील विद्यार्थिनींनी त्यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या अनेक समस्यांचे निराकरण झाले.

२) महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षांतर्गात **प्रेरणा व जागृती कार्यशाळेचे** आयोजन दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी **प्राचार्य डॉ. गुंफा कोकाटे** यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, आठव्या व नवव्या शतकात मातृसत्ताक पद्धती होती. त्या सक्षमपणे जीवन जगत होत्या. चिमणी व कावळ्याची गोष्ट ही स्त्रीसत्ताक पद्धतीचं एक उदाहरण आहे. आर्य संस्कृती बरोबर पितृसत्ताक पद्धती आलेली आहे. स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. अग्नीचा शोध लावला. मातृसत्ताक व पितृसत्ताक परिवर्तनाचा ऊहापोह होणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमांनी चंगळवादी आणि भोगवादी विचारांचा प्रसार केलेला आहे. प्रसारमाध्यमांकडून आपण नेमकं काय घ्यायचं हे आपल्या मानसिकतेवर आहे. आजची प्रसारमाध्यमे जे दाखवतात त्यातील सकारात्मक बाजू आपण स्वीकारावी. प्रसारमाध्यमांवर दाखवलेल्या काल्पनिकतेचे अनुकरण न करता त्यातील वास्तविकता स्वीकारायला हवी. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्त्रियांना सक्षम करण्याची मुहूर्तमेढ समाजसुधारकांनी रोवली. गांधींबरोबर आंदोलनातही महिलाच मोठ्या संख्येने सहभागी होत्या. लिंग भेदभाव विसरून समाजात वावरलो तरच सर्वांचा विकास होऊ शकतो. स्त्री उपभोग्य नाही. हे जेव्हा सांगितलं जातं, हे नाकारलं जातं तेव्हा हिंसाचार वाढतो. नेहमीच पुरुषसत्ताक पद्धतीच्या बळकटीसाठी स्त्री - चारित्र्याचे हनन केले जाते. समाजामध्ये वावरताना स्त्रीला स्वतःला सिद्ध करावं लागतं. तेव्हाच तिची प्रतिमा उंचावली जाते. निर्णय क्षमता वाढवणे व आर्थिक सक्षम होणे गरजेचे आहे. स्त्रियांचे सर्व बाजूंनी सर्वांगीण सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. ज्ञानाचे सामर्थ्य खरे आहे.  ते आपल्याकडून कोणीही घेऊ शकत नाही. पारनेर ची माती संघर्ष करायला आणि जिंकायला शिकवते. जयंती पुण्यतिथी साजरी करणे एवढंच आपलं कर्तव्य नाही. तर त्यांची तत्व स्वीकारणही तितकेच महत्त्वाचे आहे. मुलींनी नेहमी ठाम रहावं. आपल्या मनातील गोंधळ दूर ठेवावा. स्वतःच्या

मनावर ताबा मिळवावा. स्वतःच्या अंगी नम्रता असावी. मग कोणीही आपल्याला नाकारू शकत नाही, थांबऊ शकत नाही.

३) महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षांतर्गत **स्व - संरक्षण कार्यशाळेचे** आयोजन दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी **कु. राजेश्वरी कोठावळे** यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, मुलींनी आर्थिकदृष्ट्या सक्षम तर व्हायलाच हवे. परंतु, त्यांनी स्वतःचे संरक्षण करता यावे यासाठी कराटे प्रशिक्षणही घ्यायला हवे. आपल्यावर होणारा अन्याय आता सहन न करता त्याबद्दल आपण बोलायला शिकले पाहिजे. काहीवेळा आपल्यावर आलेल्या वाईट प्रसंगाना आपण मूकपणे सामोरे जातो. त्याबद्दल वाच्चता झाली तर समाजात आपली नाचक्की होईल या गैरसमजातून आपण पोलिसांकडे जाणे टाळतो. इथेच आपली चूक होते. आपण गुन्हेगारांना पाठीशी घालून त्यांच्या कृत्याला खतपाणी घालण्याचे काम करतो. हे आता थांबायला हवं. त्यासाठी आपल्यातील ताकत, हिम्मत आपण ओळखून आपण जागृत व्हायला हवे. ती आज काळाची गरज बनली आहे. टिव्ही आणि मोबाईलचा वापर मनोरंजनासाठी करण्याऐवजी व्यक्तिमत्त्व विकास साठी करावा. असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देत आणि प्रात्यक्षिकेही घेतली.

४) अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व महिला सक्षमीकरण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महिला उद्योजिकांची व्याख्याने या उपक्रमांतर्गत **'यशोगाथा आपल्या आजीची'** या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते. 'आपली आजी' हा पाककलेवरील यु-ट्यूब चॅनेल चालवणाऱ्या श्रीमती सुमन धामणे कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिल्या. तसेच त्यांच्या यु-ट्यूब संबंधित सर्व तांत्रिक बाजू सांभाळणारे त्यांचे नातू श्री यश पाठक हेही ह्या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री यश पाठक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यांच्या मनोगतातून त्यांनी यु-ट्यूब चॅनेल कसा चालू करावा ,त्यासाठी कोणती प्रक्रिया करावी लागते ,हा व्यवसाय करताना केलेली भांडवल गुंतवणूक आणि त्यापासून मिळालेला नफा ह्या गोष्टींचा उलगडा झाला. विशेषतःमुलींनी घरबसल्या करता येण्यासारखे ऑनलाईन मार्केटिंग आणि शेअर मार्केट बद्दलही मार्गदर्शन केले.

त्यानंतर श्रीमती सुमन धामणे यांची मुलाखत प्रा  तेहनिशहजहाँ मुजावर  व डॉ.माया लहारे यांनी घेतली.या मुलाखतीतून  आज्जींजवळ असलेल्या पाककलेबद्दल जाणून घेतले. स्वयंपाक करण्याच्या योग्य पद्धतींचा आपल्या आरोग्यावर परिणाम होतो असे आज्जींनी सांगितले. स्वयंपाकासाठी लागणारे मसाले बनवण्याचा व्यवसायाबद्दल त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.वयाचे बंधन न बाळगता कोणतेही कामात मनापासून कष्ट करण्याची तयारी ठेवा आणि  अडचणींना न घाबरता सामोरे जा. असा मोलाचा संदेश त्यांनी तरुण पिढीला दिला. विद्यार्थिनींनी आज्जीबरोबर संवाद साधून व्यवसायाची माहिती घेतली .

५) महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षांतर्गत व  गुणवत्ता हमी कक्ष आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने **सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त** विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानिमित्ताने Logo design Competition (बोधचिन्ह स्पर्धा) साठी दिनांक ११ डिसेंबर, २०२१ रोजी सूचना काढून त्यासाठी नियमावली प्रसिद्ध केली. बोधचिन्ह जमा करण्यासाठी दिनांक २७/१२/२०२१ पर्यंत कालावधी दिला. तसेच दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ला पोस्टर आणि रांगोळी स्पर्धेची सूचना काढून त्यासाठी नियमावली व स्पर्धेचे विषय प्रसिद्ध केली. पोस्टर व रांगोळीसाठी २८ डिसेंबर, २०२१ पर्यंत नाव नोंदणी चा कालावधी ठेवला होता. रांगोळी स्पर्धा शनिवार दिनांक १ जानेवारी, २०२२ या दिवशी सकाळी ११ ते १ या वेळेत संपन्न झाली.  पोस्टर दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ जमा करण्यासाठी च्या सूचना दिल्या. रांगोळी व पोस्टर साठी **मुलगा मुलगी एक समान , महिलांची विविध क्षेत्रातील उत्तुंग भरारी,  स्त्री- शिक्षण, स्त्रीयांपुढील आव्हाने, कोवीड योद्धा कोवीड पासून सुरक्षा** सदर विषय दिले होते. रांगोळी व पोस्टरसाठी मुलगा मुलगी एक समान महिलांची विविध क्षेत्रातील उत्तुंग भरारी कोविड  पासून सुरक्षा या विषयाला विद्यार्थ्यांनी पसंती दिली . लोगो- ९, पोस्टर- १५ , रांगोळी- १५ (१५x२=३०) स्पर्धक सहभागी झाले.

रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन  ३  जानेवारी, २०२२  रोजी राजर्षी शाहू सभागृहात सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या शुभहस्ते व उपप्राचार्य डॉ. दिलीप ठुबे,  विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. हरेश शेळके व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

तसेच, बोधचिन्ह स्पर्धा, पोस्टर व रांगोळी स्पर्धेचे परीक्षण उत्तम चित्रकार श्री ज्ञानेश्वर कवडे न्यू इंग्लिश स्कूल पारनेर यांनी उत्तमरीत्या करून दिले. **बोधचिन्ह स्पर्धेत** कुमार थोरात आकांक्षा बापूराव

(एफ.वाय.बी.कॉम.) हिने रेखाटलेल्या बोधचिन्हाची निवड झाली. **पोस्टर स्पर्धेत** प्रथम क्रमांक- कु. टकले साक्षी जालिंदर (T.Y .B.Sc. Zoology), द्वितीय क्रमांक- कु. थोरात आकांक्षा बापूराव (F.Y. B.Com), तृतीय क्रमांक – कु . सातपुते अंकिता भाऊसाहेब (F.Y. B.Sc.) . **रांगोळी स्पर्धेत** प्रथम क्रमांक- कु. कावरे सोनाली सुरेश (T.Y. B.Sc. Mathematics), कु. सोनवणे अनिता अशोक (T.Y. B.Sc. Mathematics), द्वितीय क्रमांक –कु. खामकर आरती तुकाराम (M. Sc. Chemistry), तृतीय क्रमांक - कु. खामकर स्नेहल रामदास (M. Sc. Chemistry), कु. आभाळे श्रद्धा रंगनाथ (M.Sc. Chemistry)

३ जानेवारी, २०२२ ला सकाळी ९:३० वाजता एका भव्य रॅलीचे आयोजन केले गेले. महाविद्यालयाच्या विज्ञान विभागातील आवारात प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर सर यांनी **सावित्रीबाई फुले** यांचे प्रतिमापूजन केले. यावेळेस अंतर्गत हमी गुणवत्ता कक्ष व उपप्राचार्य डॉ. दिलीप ठुबे सर , प्रा. महेश आहेर सर, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. घुंगार्डे सर, सर्व विभाग प्रमुख , NCC प्रमुख डगळे सर, महिला सक्षमीकरण मधील सर्व प्राध्यापिका एनसीसीचे विद्यार्थी व विद्यार्थिनी व कला वाणिज्य व विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. रॅली महाविद्यालयापासून पारनेर बस स्थानकापर्यंत व परत दुसऱ्या मार्गाने कॉलेजमध्ये विज्ञान विभागातील आवारात सांगता झाली. मुलींच्या हातामध्ये घोषणा फलक होते. सर्व विद्यार्थिनी रस्त्याने घोषणा देत होत्या तसेच रॅलीचे विसर्जना पूर्वी सर्व बॅनर धारक विद्यार्थिनी स्टेजवर जाऊन उभ्या राहिल्या आणि प्राध्यापक मस्के मॅडम व त्यांनी परत घोषणा देऊन सर्व परिसरात स्फूर्तीचे वातावरण तयार केले व काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे महत्त्व विषद केले व आपण त्यांच्यामुळे आज उत्तुंग यश यश शिखर सर करू शकतो याची सर्वांना जाणीव करून दिली या प्रसंगी काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशात सहभागी झाल्या होत्या.

६) महिला सक्षमीकरण कक्षांतर्गत दिनांक ४ आणि ५ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयाच्या निधीतून **"सॉफ्ट टॉईज मेकिंग"** दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत विविध विद्याशाखांच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

सदर कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून, श्रीमती. प्रमिला काळे, शिरूर, जिल्हा-पुणे यांनी विद्यार्थिनींना टेडी बेअर, कुत्रा इत्यादी विविध प्रकारची सॉफ्ट टॉईज बनवण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सॉफ्ट टॉईज बनवण्यासाठी साहित्य कसे वापरायचे, खेळणीचे वेगवेगळे भाग कसे कापायचे हे शिकवले. टेडी बेअर आणि

कुत्रा, मग वेगवेगळे भाग कसे जोडायचे आणि ही शिलाई सामान्य शिलाईपेक्षा वेगळी कशी आहे. याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी कापूस खेळण्यांमध्ये भरला जातो आणि उर्वरित फिनिशिंग केले जाते. सर्व खेळणी तयार असून खेळण्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. के. आहेर, उपप्राचार्य आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. डी. आर. ठुबे हस्ते करण्यात आले. श्रीमती. प्रमिला काळे यांनी सर्व मुलींच्या सक्रिय सहभागाबद्दल आणि खेळणी बनवण्याची आवड दाखवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. प्राचार्य डॉ.आर.के.आहेर म्हणाले की, आजच्या महिला सर्व काही करण्यास सक्षम आहेत आणि त्यांनी मुलींना ही संधी साधून स्वतःचा खेळण्यांचा व्यवसाय सुरू करण्यास प्रवृत्त केले. उपप्राचार्य आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. डी.आर. ठुबे यांनी या मुलींना खेळण्यांच्या पुढील प्रचारासाठी आणि विक्रीसाठी महाविद्यालय मदत करेल, असे आश्वासन दिले. प्रदर्शनात तयार केलेली खेळणी पाहुण्यांना विकण्यात आली.

७) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी **संगणक साक्षरता कार्यक्रमाचे** आयोजन दिनांक **२० ते २४ डिसेंबर, २०२१** दरम्यान केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, विद्यार्थिनींना आपल्या छोटया छोटया कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. संगणकाचे दैनंदिन जीवनातले महत्व ओळखून त्यांनी आज परिपूर्ण ज्ञान मिळविले पाहिजे. म्हणून महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी याचा लाभ घ्यावा. असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमांतर्गत अंतर्गत खालील घटकांचे प्रशिक्षण विद्यार्थीनींना दिले गेले:

1. How to create Email?
2. How to create PDF?
3. How to write the Resume?
4. PPT Presentation
5. Filling of Examination Form
6. How to register on Swayam portal?

विद्यार्थीनीना त्यांच्या दैनंदिन जीवनात आवश्यक असणारे संगणक ज्ञान त्यांना असावे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास एकूण २५७ विद्यार्थिनींनी नावनोंदणी केली. तर प्रत्यक्षात २०० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. प्रियांका आतकर, प्रा. पाटाडे , प्रा. सातपुते यांनी केले.

यासर्व उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक, नॅक समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी, महिला सक्षमीकरण कक्ष समन्वयक, तसेच, महाविद्यालयातील प्राध्यापिका आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन महिला सक्षमीकरण कक्षाच्या सर्व सदस्य प्रध्यापिकांनी केले. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन संवाद कौशल्यात वाढ  निर्माण झाली. त्याचप्रमाणे, काही उपक्रमांमध्ये विद्यार्थिनी बरोबरच काही प्रमाणात विध्यार्थ्यांचा सहभागही या उपक्रमांमध्ये आढळून आला.

समन्वयक

समन्वयक

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

Professor (Dr.) D. R. Thube
Research Guide in Chemistry
New Arts, Commerce and Science College
Parner, Dist.A'Nagar(MS)-414302

प्राचार्य
न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
पारनेर, जि. अहमदनगर

## 7.1.1 Activities of Women Empowerment Cell 2021-22





**Figure 1: Workshop on Women Health and Hygiene**




**Figure 2: Workshop on Women Health and Hygiene**




Figure 3: Induction Program for awareness about gender sensitization




Figure 4: Induction Program for awareness about gender sensitization




**Figure 5: Self Defense Workshop**




**Figure 6: Self Defense Workshop**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पारनेर

ता.पारनेर, जि. अहमदनगर – ४१४३०२

## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व महिला सक्षमीकरण कक्ष

आयोजित

# "यशोगाथा आपल्या आजीची"



## श्रीमती सुमन धामणे

अहमदनगर जिल्ह्यातील सारोळा कासार सारख्या ग्रामीण भागातुन पुढे येऊन पाककलेच्या जोरावर **आपली आजी** हा YouTube चा चॅनल चालवणाऱ्या सुप्रसिद्ध अन्नपूर्णा यांचा प्रवास त्यांच्याच शब्दांत...

**दिनांक** : २९ डिसेंबर २०२१
**वेळ** : सकाळी १०.३० वा.

**स्थळ** :
डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम सभागृह

**डॉ.माया लहारे**
समन्वयक

**प्रा.डॉ.दिलीप ठुबे**
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक
उप-प्राचार्य

**डॉ.रंगनाथ आहेर**
प्राचार्य

*महिला व गृहिणींसाठी सुवर्णसंधी*




**Figure 7: Interview Session of renowned YouTuber**




**Figure 8: Interview Session of renowned YouTuber**



**Figure 9: Celebration of Savitribai Phule Jayanti**



**Figure 10: Celebration of Savitribai Phule Jayanti**




**Figure 11: Rally for Women Education and Empowerment**




**Figure 12: Rally for Women Education and Empowerment**




**Figure 13: Rally for Women Education and Empowerment**




**Figure 14: Rally for Women Education and Empowerment**




**Figure 15: Rangoli Competition**




**Figure 16: Rangoli Competition**




**Figure 17: Poster Competition**




**Figure 18: Poster Exhibited in the Competition**


Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's
New Arts, Commerce and Science College, Parner
Dist. Ahmednagar – 414302 (Maharashtra)
NAAC Re-accredited 'A' Grade, DST-FIST & RUSA Sponsored College
Two Days Workshop
on
"Soft Toys Making"
4-5 January 2021 09.00AM – 11.30 AM
Organized By
IQAC and Women Empowerment Cell
Dr. S. G. Kundlikar
(Member)
A. K. Thube
(Member)
S. S. Raskar
(Member)
Dr. M. N. Lahare
Coordinator
Prof. Dr. D. R. Thube
Vice Principal
Dr. R. K. Aher
Principal


Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's
New Arts, Commerce and Science College, Parner
Dist. Ahmednagar - 414302 (Maharashtra)
Two Days Workshop
on
"Soft Toys Making"
EXHIBITION AND SALE
6 January 2022 at 10.00 am to 12.00 pm
Organized By
IQAC and Women Empowerment Cell
Dr. S.G.Kundlikar
Member
A.K.Thube
Member
S.S.Raskar
Member
Dr. M.N.Lahare
Coordinator
Prof. Dr. D. R. Thube
Vice Principal
Dr. R. K. Aher
Principal




Figure 17: Soft Toys Making Workshop





Figure 18: Soft Toys Making Workshop




Figure 19: Soft Toys Making Workshop




Figure 20: Soft Toys Making Workshop





**Figure 21: Computer Literacy Programme**





**Figure 22: Computer Literacy Programme**





Figure 23: Computer Literacy Programme





Figure 24: Computer Literacy Programme

